**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः22.11.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या.**

1. पंतप्रधान मोदी यांना ‘द ऑर्डर ऑफ एक्सलन्स’ हा गयानाचा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान प्रदान

2. विधानसभा निवडणुकीची उद्या मतमोजणी, प्रशासनाकडून चोख व्यवस्था

3. राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी आणि बारावीच्या परिक्षांचं वेळापत्रक जाहीर

**आणि**

4. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर- गावसकर चषक क्रिकेट स्पर्धेला आजपासून सुरुवात

**पंतप्रधान-गयाना**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना काल गयानाचा 'द ऑर्डर ऑफ एक्सलन्स' हा सर्वोच्च राष्ट्रीय सन्मान प्रदान करण्यात आला. गयानाच्या स्टेट हाऊसमध्ये झालेल्या समारंभात, गयानाचे राष्ट्राध्यक्ष डॉक्टर मोहम्मद इरफान अली यांच्या हस्ते मोदी यांना सन्मानित करण्यात आलं. पंतप्रधान मोदींनी हा सन्मान भारतातील लोकांना आणि दोन्ही देशांतील लोकांमधील खोलवर रुजलेल्या ऐतिहासिक संबंधांना समर्पित केला.

**पीएम गयाना**

पंतप्रधान मोदी यांनी काल गयानामध्ये भारतीय समुदायाला संबोधित केलं. गेल्या दशकभरात झालेला भारताचा प्रवास हा प्रमाण, गती आणि शाश्वततेचा प्रवास असल्याचं मोदी म्हणाले. भारत लवकरच जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला. भारताचा विकास केवळ प्रेरणादायीच नव्हे तर समावेशक देखील आहे, असंही मोदी म्हणाले. तत्पूर्वी त्यांनी काल गयानाच्या संसदेच्या विशेष सत्रालाही संबोधित केलं. नायजेरिया, ब्राझील आणि गयाना या तीन देशांचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी मायदेशी रवाना झाले आहेत.

**मतमोजणी**

राज्यात एकाच टप्प्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीची तसंच नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी झालेल्या पोटनिवडणुकीची मतमोजणी उद्या होणार आहे. मतमोजणी प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी, यासाठी प्रशासनाकडून चोख नियोजन करण्यात आलं असून प्रत्येक मतमोजणी केंद्रांवर कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. राज्यभरतल्या

सर्व  288 मतमोजणी केंद्रांवर सकाळी 8 वाजता मतमोजणी सुरू होईल. टपाली मतपत्रिकांची मतमोजणी आधी होईल, त्यानंतर ईव्हीएमवरील मतांची मोजणी सकाळी साडे आठ वाजता सुरू होईल.

पुणे शहरातील आठ मतदार संघांची मतमोजणी कोरेगांव पार्क इथल्या भारतीय खाद्य महामंडळामध्ये, पिंपरी आणि भोसरी मतदार संघाची मतमोजणी बालेवाडी इथं आणि चिंचवड मतदार संघाची मतमोजणी शंकरराव गावडे स्मृति भवन इथं होणार आहे. पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विधानसभा मतदार संघातील मतमोजणी त्या त्या भागात होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात अंदाजे 66 टक्के मतदान झालं असून, गेल्या तीस वर्षातील ही उच्चांकी टक्केवारी आहे. या निवडणूकीमध्ये मतदारांनी जास्तीत जास्त संख्येने मतदान करावं यासाठी  जिल्हा आणि तालुका स्तरावर स्वीप कार्यक्रमाअंतर्गत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात आले. या उपक्रमांमुळे पालघर जिल्ह्यात या निवडणुकीत सरासरी 66 पूर्णांक 33 टक्के मतदान झाले. 2019 च्या निवडणुकीच्या तुलनेत यात 7 टक्क्यांची वाढ दिसून आली. गडचिरोली जिल्ह्यातही 75 पूर्णांक 26 टक्के मतदानाची नोंद झाली. कोल्हापूर जिल्हा मतदानाच्या टक्केवारीत राज्यात अग्रेसर राहिला असून, जिल्ह्यात 76 पूर्णांक 63 टक्के इतकं विक्रमी मतदान झालं. याबाबत बोलताना कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे म्हणाले..

**व्हॉईसकास्ट-ईफ्फी**

55 व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फीमध्ये काल, क्रिएटिव्ह माइंड्स ऑफ टुमारोच्या चौथ्या आवृत्तीचं उद्घाटन करण्यात आलं. प्रसार माध्यमं आणि मनोरंजन क्षेत्रातील उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने हा

उपक्रम सुरू केला होतं. मंत्रालयाचे सचिव संजय जाजू यांच्या हस्ते याचं उद्घाटन करण्यात आलं. या कार्यक्रमाला मंत्रालायचे माजी सचिव अपूर्व चंद्रा, विशेष सचिव निरजा शेखर तसंच  प्रसिद्ध गीतकार आणि  सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशनचे अध्यक्ष, प्रसून जोशी उपस्थित होते.

दरम्यान प्रसार भारतीनं 'वेव्ज' या आपल्या ओवर द टॉप म्हणजे ओटीटी मंचाचाही या चित्रपट महोत्सवात आरंभ केला. ऐकुया या विषयीची अधिक माहिती..

भारताची कथा एकत्र विणण्यामध्ये प्रसार भारतीचं स्थान धाग्यासमान आहे. 1936 मध्ये रेडिओवरील पहिल्या प्रसारणापासून, 1959 मध्ये दूरदर्शनचे आगमन, आणि 2003 मध्ये फ्री-टू-एअर सॅटेलाइट टेलिव्हिजनपर्यंत, हे केवळ माध्यमांतर नाही; तर लोक, क्षण आणि प्रवास यांचा हा इतिहास आहे. प्रसार भारतीच्या यशामागे समर्पण, कठोर परिश्रम आणि पुढाकार नेहमीच प्रेरक राहिले आहेत. कथा, संगीत, बातम्या, आठवणी आणि वारसा यांचा भक्कम पाया आहे. प्रसार भारती परिवाराने अनेक दशके पार केल्यानंतर आता कालौघानुसार एका नव्या युगात पाऊल टाकलं आहे. एक महत्त्वाची झेप घेतली आहे WAVES OTT च्या स्वरुपात! WAVES हे केवळ एक ॲप नाही; तर चलती असलेली नवनवीन सामग्री एकत्र आणून भूतकाळ, वर्तमान आणि भविष्याशी जोडणारं साधन आहे. कालातीत अभिजात कार्यक्रम, लोकप्रिय टीव्ही शो, सर्वोच्च पसंतीचं संगीत, लाइव्ह पॉडकास्ट, ई-पुस्तके आणि अगदी गेमिंग—सर्व एकाच ठिकाणी. आकाशवाणी आणि दूरदर्शनचा समृद्ध वारसा यामध्ये आहे सोबतच आधुनिक तंत्रज्ञान आणि समकालीन सामग्री समाविष्ट आहे. वेव्ज आकाशवाणी आणि दूरदर्शनचे तरंग घरोघरी पोहोचविणरा नव्या युगातला माध्यमी अवतार आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.

**दहावी,बारावी वेळापत्रक**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुढच्या वर्षी फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचं वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आलं आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा 11 फेब्रुवारी ते 18 मार्च या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा 21 फेब्रुवारी ते 17 मार्च या कालावधीत होणार आहे. परीक्षेचं विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलं आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकाची सुविधा ही केवळ माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडे छापील स्वरुपात देण्यात येणारं वेळापत्रकच अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या तारखांची खात्री करून परीक्षा द्यावी. अन्य कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध झालेलं वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असं या निवेदनात स्पष्ट करण्यात आलं आहे.

**CBSE वेळापत्रक**

सी बी एस ई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीची परीक्षा 15 फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याची घोषणा काल मंडळातर्फे करण्यात आली. दहावीच्या परीक्षा 18 मार्चला तर, बारावीच्या परीक्षा 4 एप्रिल रोजी संपणार आहेत.

**हुतात्मा स्मारक भेट-मुख्यमंत्री**

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात 105 जणांनी हौतात्म्य पत्करलं होतं; त्या घटनेचं स्मरण म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईतील हुतात्मा स्मारकावर पुष्पचक्र अर्पण

करून हुतात्म्यांना अभिवादन केलं. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील काल हुतात्म्यांना अभिवादन केलं.

## लष्करी सराव

भारत आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या तिसऱ्या संयुक्त लष्करी सरावाची सांगता काल पुण्यात झाली. या सरावात दोन्ही देशांचे 255 जवान सहभागी झाले होते. या संयुक्त लष्करी सारवामुळे, दोन्ही देशातील संबंध अधिक दृढ झाले आहेत, असं मेजर जनरल के टी जी कृष्णन यावेळी बोलताना म्हणाले. ऑस्ट्रेलियाचे मेजर जनरल डेबिट थोमी हे देखील यावेळी उपस्थित होते. दोन आठवड्याच्या या संयुक्त सरावात तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, समरिक कौशल्याचं आदानप्रदान, युद्ध कवायती, लष्करातील वैद्यकीय सुविधांची माहिती देण्यात आली. भारत आणि ऑस्ट्रेलियाचा चौथा संयुक्त लष्करी सराव पुढच्या वर्षी ऑस्ट्रेलियामध्ये होणार आहे.

## समाधी सोहळा

संत ज्ञानेश्वर माऊलींच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त आळंदीमध्ये उद्यापासून 30 नोव्हेंबरपर्यंत कार्तिक वारी होणार आहे. 26 तारखेला कार्तिक एकादशी तर 28 तारखेला माउलींचा संजीवन समाधी सोहळा आहे. यानिमित्त आळंदीमध्ये सुमारे सहा ते सात लाख भाविक दर्शनासाठी येतील असा अंदाज आहे. या काळात गर्दीचं नियोजन करण्यासाठी उद्यापासून पुढचे आठ दिवस आळंदीत प्रवेश करणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी करण्यात आली आहे. वारकऱ्यांच्या दिंडीची वाहनं आणि अत्यावश्यक सेवा देणाऱ्या वाहनांना मात्र यातून वगळण्यात आलं आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली.

## क्रिकेट

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच कसोटी सामन्यांच्या बहुप्रतीक्षित बॉर्डर- गावसकर चषक स्पर्धेला  आजपासून सुरुवात होत आहे. मालिकेतला पहिला सामना पर्थ इथल्या ऑप्टस मैदानावर थोड्याच वेळात सुरू होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार 7 वाजून 50 मिनिटांनी हा सामना सुरू होईल. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा वैयक्तिक कारणामुळं पहिली कसोटी खेळू शकणार नसल्यानं त्याच्या अनुपस्थितीत जसप्रीत बुमराह भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहे. भारताचा फलंदाज शुभमन गिल देखील अंगठ्याला झालेल्या दुखापतीमुळं  हा सलामीचा सामना खेळू शकणार नाही. ही स्पर्धा पुढील वर्षाच्या सात जानेवारी पर्यंत चालणार आहे.

## हवामान

राज्याच्या अनेक भागात किमान तापमानात घट झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**